दूरध्वनी : २८४१५७६/२०२६२४९ फॅक्स : २०२१३४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्स्प्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/354 दिनांक : ३० जानेवारी, २००१

**परिपत्रक क्र.- ६१**

**विषय** : दि.२६ जानेवारी, २००१ रोजी झालेल्या भूकंपाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनेतील उपांगांचा आढावा घेणे.

दि.२६ जानेवारी, २००१ रोजी गुजरात राज्यात भूकंपाचे तीव्र धक्के बसले. त्याबरोबर महाराष्ट्रामध्ये देखील काही ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत याची आपणास कल्पना आहेच. या भूकंपामुळे पाणी पुरवठा योजनेतील उपांगांना हानी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी हानी उद्‌भवली असल्यास त्यावर वेळीच उपाय योजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

या अनुषंगाने आपणा सर्वांस निर्देशित करण्यात येते की, आपण आपल्या कार्यक्षेत्रातील नागरी व ग्रामीण पाणी पाणी पुरवठा योजनांच्या उपांगांची पहाणी करुन त्यांना भूकंपामुळे हानी पोहचलेली नाही याची खात्री करावी. काही ठिकाणी भूकंपामुळे पाणी पुरवठा योजनांच्या उपांगांना तडे गेले असतील तर त्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनां संदर्भात या कार्यालयास सविस्तर अहवाल सादर करावेत.

पाणी पुरवठा योजनांतील उपांगे भूकंपाच्या धक्क्यापासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांची संकल्पना करताना या संदर्भात भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या आय.एस.१८९३ मधील तरतुदीनुसार ती करण्यात येते. नुकत्याच झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर आपल्या कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांच्या उपांगांची संकल्पना वर उल्लेख केलेल्या आय.एस.१८९३ मधील तरतूदींनुसार योग्य तऱ्हेने करण्यात आलेली आहे याची देखील पुन्हा खात्री करुन घ्यावी. विशेषत: ज्या उपांगांचे संकल्पन संबंधित ठेकेदार खाजगी सल्लागारांमार्फत करुन घेतात अशा संकल्पनांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करुन घेत असताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे याचीही नोंद घ्यावी.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत : खाजगी सचिव, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव (प्रशासन), म.जी.प्रा., मुंबई
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई
मुख्य अभियंता (सर्व), म.जी.प्रा.
अधीक्षक अभियंता (सर्व), म.जी.प्रा.मंडळ
कार्यकारी अभियंता (सर्व), म.जी.प्रा.बांधकाम विभाग

M. J. P.
ISSUED
31 JAN 2001
MUMBAI-21